15-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/14/2025 11:20 PM Page 1



# सामाजिक भेदभाव दूर करण्यात डॉ. आंबेडकरांचे मोठे योगदान

## आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये : डिचोलीत आंबेडकर जयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. आज आमचे सरकार समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणून अनेक योजना बहाल करीत असून त्याचा लाभ घेताना उत्कर्ष साधावा, असे आवाहन डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी केले.



**डिचोली : हरिजनवाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करताना आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये. बाजूला नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, दिपा पळ, डॉ. कौस्तुभ पाटणेकर, इतर मान्यवर व समाज बांधव.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीतर्फे हरिनामा आघाडीचे येथे आयोजित करण्यात आलेल्या आंबेडकर जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, उपनगराध्यक्ष दिपा पळ, भाजप मंडळ अध्यक्ष डॉ. कौस्तुभ पाटणेकर नीलेश टोपले, दिपा शिरगावकर, नारायण बेतकीकर, दादा पळ, विश्वास गावस व विश्वास गावकर, शर्मिला फळ गोविंद परवा, शेखर परवार, तारी गुरुजी, दादी करमळकर आदी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज बांधवांना संघटित होण्याची हाक दिली होती, मात्र आज काही ठिकाणी समाज असंघटित होत असल्याने विकासावर परिणाम होत आहेत. आपले मतभेद विसरून सर्वांनी संघटित राहून केंद्र व राज्याच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे यावे व आंबेडकरांनी घालून दिलेला आदर्श सांभाळत समाज बांधवांनी आपला उत्कर्ष साधावा, असे आवाहन डॉ. शेट्ये यांनी केले.

डॉ. कौस्तुभ पाटणकर यांनी शिक्षणात अतिशय हुशार असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाची घटना लिहिली तसेच दलित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महान योगदान दिल्याचे सांगितले.

विजयकुमार नाटेकर यांनी आंबेडकरांचा आदर्श घेताना सर्वांनी एकी राखावी व बंधुभाव जपत विकासाला चालना द्यावी. शहरात प्लास्टिक मुक्तीसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

मान्यवरांच्या हस्ते आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. सूत्रसंचालन गोविंद परवार यांनी केले. यावेळी स्थानिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून

### राय खूनप्रकरणी दोघा कामगारांना अटक

श्वानपथक व ठसेतज्ज्ञ बोलावून घेऊन तपास करण्यात आला होता. याप्रकरणी एका कामगाराला मडगावात ताब्यात घेण्यात आले होते. त्याच्याकडून माहिती घेऊन दुसऱ्या कामगाराला बांबोळी येथून उचलण्यात आले व नंतर दोघांवरही खूनाचा गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली. एका बांधकाम आस्थापनाच्या ठिकाणी हे कामगार काम करीत होते व सांतेमळ येथे भाड्याच्या खोलीत राहत होते. शनिवारी पगार झाल्यानंतर रात्री त्यांनी पार्टी आयोजित केली होती. नंतर दारूच्या नशेत हे खूनप्रकरण घडल्याची माहिती शेजाऱ्यांकडून पोलिसांना मिळाली. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याची माहिती उपअधीक्षक सिद्धांत शिरोडकर यांनी दिली.

---------------

### आयपीएल ऑनलाइन सट्टेबाजीचे सूत्रधार कोण ?

मटका जुगारासारखीच आहे. प्रत्येक कोपऱ्यात बुकी कार्यरत आहेत कारण यात मोठा पैसा गुंतलेला आहे. सट्टेबाजीमधून कमावलेले पैसे कॅसिनोमध्ये खर्च केले जातात, ही एका विशिष्ट वर्गातील भव्य जीवनशैली बनली आहे, असेही पोलिस अधिकाऱ्यांनी नमूद केले. सध्या अटकेतील आरोपी हे या मोठ्या रॅकेटचा केवळ हिमनगाचे टोक' असल्याचे स्पष्ट होत आहे. मुख्य बुकी हे भारताबाहेर असण्याची शक्यता असून, विशेषतः गुजरात राज्याशी त्यांचे जाळे जोडलेले आहे. बेटेफेअर'सारख्या सट्टेबाजी वेबसाइट्सवर दर ठरवले जातात. युनायटेड किंग्डममध्ये या ॲप्सवर सट्टेबाजी कायदेशीर आहे. मात्र, भारतात हे ॲप वापरणे, दर ठरवणे किंवा त्यावर खेळणे हे कायद्यानुसार प्रतिबंधित आहे.

# आंबिये महाविद्यालयात रोजगारकेंद्रित ४ नवीन अभ्यासक्रमांना प्रारंभ

**उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर यांची माहिती**

■ टीम दैनिक हेराल्ड



**विर्नोडा, दि. १४ :** ज्ञान, कौशल्य, व्यावहारिक अनुभव आणि रोजगारक्षमता वाढविण्यासाठी गोव्यातील तरुणांना समक्ष करण्याचा गोवा सरकारचे ध्येय असून हे ध्येय साध्य करण्यासाठी संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडा येथे २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाकरिता चार नवीन रोजगारकेंद्रित अभ्यासक्रमांना प्रारंभ झाला आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर यांनी पर्वरी येथील उच्च शिक्षण संचालनालयाच्या परिषद सभागृहात दिली.

गोव्यातील तरुणांची व्यावसायिक आणि औद्योगिकदृष्ट्या विकासात्मक वाढ होण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्य आणि व्यावहारिक अनुभव देण्यासाठी बीबीए, बीएससी इन बायोटेक्नॉलॉजी, बीएससी इन स्पोर्ट्स ॲण्ड एक्सरसाईज सायन्स, बीएससी इन सायकॉलॉजी हे विषय सुरू करण्यात आलेले आहेत, असेही संचालक सावईकर म्हणाले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य जुवांव कोस्टा, उपप्राचार्य आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. लुसी जेम्स, बीएससी इन स्पोर्टस ॲण्ड एक्सरसाईज सायन्सचे प्रभारी डॉ. सॅम ब्रागांझा, बीएससी इन बायोटेक्नॉलॉजीचे प्रभारी डॉ.पंकज परब आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा**

बीबीए, बीएससी इन बायोटेक्नॉलॉजी, बीएससी इन स्पोर्ट्स ॲण्ड एक्सरसाईज सायन्स, बीएससी इन सायकॉलॉजी या अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहनही यावेळी संचालक सावईकर यांनी केले. उच्च शिक्षण संचालनालयाच्या समर्थ ई पोर्टलवर विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी अर्ज करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

**विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अभ्यासक्रम : प्राचार्य कोस्टा**

बीबीए, बीएससी इन बायोटेक्नॉलॉजी, बीएससी इन स्पोर्ट्स ॲण्ड एक्सरसाईज सायन्स, बीएससी इन सायकॉलॉजी हे अभ्यासक्रम उद्योग आणि कंपन्या यांच्या गरजांशी सुसंगत असून या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तात्काळ रोजगाराची संधी मिळू शकते, असे प्राचार्य जुवांव कोस्टा यांनी सांगितले. तज्ज्ञ अतिथी व्याख्यात्यांकडून मार्गदर्शन, प्रात्यक्षिकाची संधी, वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये अनुभवही या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मिळणार आहे, असेही प्राचार्य जुवांव कोस्टा यांनी सांगितले.

**समाजाच्या गरजा लक्ष्यात घेऊन अभ्यासक्रमांची आखणी : तळावलीकर**

विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी या चार नव्या अभ्यासक्रमांचायदा होणार असून उद्योग आणि समाज यांच्या गरजा लक्ष्यात घेऊन हे अभ्यासक्रम तयार केले असल्याची माहिती बीबीए अभ्यासक्रमाच्या प्रभारी डॉ.हर्षा तळावलीकर यांनी दिली.

**विद्यार्थ्यांनी इथे साधावा संपर्क**

बीबीए, बीएससी इन बायोटेक्नॉलॉजी, बीएससी इन स्पोर्ट्स ॲण्ड एक्सरसाईज सायन्स, बीएससी इन सायकॉलॉजी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी

# सावईवेरेत 'बलराम श्रमधाम'अंतर्गत सभापतींच्या हस्ते ४ घरांची पायाभरणी



■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १४ :** सभापती डॉ. रमेश तवडकर यांच्या संकल्पनेतून बलराम श्रमधाम योजना प्रियोळ मतदारसंघात सध्या जोरात चालू आहे. बलराम चॅरिटेबल ट्रस्टच्या श्रमधाम योजनेअंतर्गत हनुमान जयंती प्रित्यर्थ अत्यंत गरजू लोकांसाठी प्रियोळ मतदारसंघात एकूण चार घरांची रमेश तवडकर यांच्या हस्ते पायाभरणी करण्यात आली.

यात भोम येथील खुशाली गावडे व वासुदेव नाईक, तिवरे येथील महेश परवार व पाली - सावईवेरे येथील दुर्गाराम पालकर यांना गणेशचतुर्थीच्या अगोदर नवीन घराच्या चाव्या देण्याचा संकल्प केला आहे. भारतमाता की जय, वंदे मातरम्, श्रमधामाचा विजय असो, जय जय श्रमधाम अशा जयघोषात श्रमधाम योजनेत येथील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शवून काम सुरू करण्यात आले आहे.

या सोहळ्याल सभापतीसह सुनील भोमकर, ॲड. सुषमा गावडे, विनय गावकर, महेश शिलकर, धाकू मडकईकर, विलास पालकर तसेच बरेच नागरिक व श्रमधाम स्वयंसेवक उपस्थित होते.

सभापती तवडकर म्हणाले की, राज्यभरात सध्या अनेक ठिकाणी गरजू व्यक्तींना श्रमधाम योजनेतून निवारा उभारण्यासाठी झटत आहे. श्रमधाम योजनेतून प्रियोळ मतदारसंघातील आतापर्यंत अत्यंत गरीब व गरजवंत अशा सहा व्यक्तींना घरकुल मिळाले आहे तर अजून सहा गरजुंच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. श्रमधामातून संपूर्ण गोमंतकात ४० घरांची उभारणी केली असून यावर्षी एकूण ५० घरे बांधण्याचा संकल्प केला आहे. सामूहिक तत्त्वावर श्रमदानातून घर उभारणी करण्यात येत आहे. अडलेल्या - नडलेल्या निराधार लोकांना श्रमदानातून घर बांधणी करून राहण्यासाठी निवारा पुरवणे हीच श्रमधामाची संकल्पना आहे.श्रमधाम योजनेच्या माध्यमातून प्रियोळ मतदारसंघात बऱ्याच कार्यकर्त्यांची फौज तयार झाली आहे.त्यामुळे आता काणकोणहून श्रमधाम वॉरियर्स आणण्याची आवश्यकता नाही, अशी माहिती सभापती तवडकर यांनी दिली.

# विद्यार्थी, कर्मचारी यांनी समजून घेतला पॉश कायदा

**ॲड रेश्मी सावंत यांचे मार्गदर्शन ; साखळी महाविद्यालयात विशेष व्याख्यान**

■ टीम दैनिक हेराल्ड



**साखळी, दि. १४ :** कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय साखळी येथील अंर्तगत तक्रार समिती आणि महाविद्यालयीन समुपदेशन आणि मूल्य शिक्षण कक्षाने महाविद्यालयाच्या सभागृहात पॉश कायदा (कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक) या विषयावर व्ही. एम. साळगावकर महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक ॲड. रेश्मी सावंत यांचे व्याख्यान आयोजित केले होते. महिलांचे संरक्षण आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित शैक्षणिक वातावरण सुनिश्चित करून त्यासंदर्भात विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा हेतू हे व्याख्यान आयोजित करण्यामागचा होता. उपप्राचार्य रोझालिना डिसिल्वा यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

ॲड. रेश्मी सावंत यांनी आपल्या व्याख्यानात पॉश कायदा २०१३ तील प्रमुख बाबी उलगडून सांगितल्या. ज्यामध्ये शैक्षणिक संस्थांमधील त्याची प्रासंगिकता, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आणि तक्रारी हाताळण्यात अंतर्गत तक्रार समितीची भूमिका इत्यादी बाबी उलगडून सांगितल्या.

लैंगिक छळ म्हणजे काय, छळ म्हणून पात्र ठरणाऱ्या कृती, स्वीकारार्ह आणि अयोग्य वर्तनातील फरक यांसारख्या मुद्द्यांचा परामर्श घेताना ॲड. रेश्मी सावंत यांनी केस स्टडीज सांगितल्या. त्यामुळे या दरम्यान झालेली चर्चा अधिक कायद्याशी संबंधित व माहितीपूर्ण झाली.

विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी या व्याख्यानात सक्रिय सहभाग घेत पॉश कायदा समजून घेतला. या विशेष व्याख्यानासाठी महाविद्यालयातील ८३ विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# गावस विद्यालयाचा निकाल ९६.३० टक्के

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** डिचोली तालुक्यातील लाटमबारसे पंचायत क्षेत्रातील हुतात्मा बाबुली नारायण गावस स्मृती शासकीय माध्यमिक विद्यालय कासारपालचा २०२४ - २५ सालचा शालान्त परीक्षेतील दहावीचा निकाल ९६.३० टक्के लागला आहे.

यात मनोज श्याम कुडचिरेकर याने ८१.५० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक, साक्षी नागेश कासारपालकर हिने ७८.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर रुद्र रुपेश कवळेकर याने ७५.८३ गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या विद्यालयातून शालांत परीक्षेला एकूण २७ विद्यार्थी बसले होते, त्यातील २६ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. त्यात तीन विद्यार्थी विशेष श्रेणीत, पाच विद्यार्थी प्रथम श्रेणीत, बारा विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, सहा विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले तर एका विद्यार्थ्याला एटीकेटी मिळाली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिद्धी खानोलकर व शिक्षक वर्ग तसेच पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष गुरुदास गाड्डी व इतर सदस्य यांनी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**CHANGE IN NAME**

I, **Kausalya R,** daughter of Ramesh R r/o Govt Md Accn 5 TTR, Bambolim Army Camp, Goa & Permanent resident of D.No - 3/164 - B, Vill + Po - Thippanapalli, P.S - Kurumbarapalli, Dist - Krishnagiri, 635115. State - Tamil Nadu, Have change my name from **R KAUSALYA** to **KAUSALYA R**. Hereafter in all my dealings and documents, I will be known by the name **KAUSALYA R.**

**IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION 'C' COURT AT MAPUSA**

**Civil Misc. Appl. No. 197 / 2024 / C**

Mr. Srijit Kumar, Son of Late D. Kumar Pillai, aged 34 years, service, R/o H. No. SA-I, Udayan Bhatkar Vaddo, Socorro, Porvorim, Bardez, Goa
........Petitioner / Applicant
V/s
No Respondent

**NOTICE**

WHEREAS the above named applicant have filed an ***Application for grant of Succession Certificate under section 372 of Indian Succession Act*** and upon perusing the said applications this Court has Ordered to issue notice to publication on the local daily newspaper circulated in the State of Goa calling for objection if any.

AND WHEREAS the said applicant has stated that there are no more heirs and he / she left neither ascendants nor descendants.

THEREFORE, if any person who has a better right or equal right as that of the applicant can put forth his / her claim within 20 days from the publishing of notice.

Take note that if you fail to comply with the above mentioned clause, the proceedings shall proceed in your absence. The matter is fixed for appearance on **19.04.2025 at 10.00 am**

Given under my hand and the seal of the Court this 13th day of March 2025.

Sd/- ( Nilima S. Kankonkar ) Seal
As-hoc Senior Civil Judge, 'C' Court, Mapusa

# स्वामी विवेकानंद हे जगाचे प्रेरणास्थान

## अमीर परब : विवेकानंद विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयाचे बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १४ :** स्वामी विवेकानंद हे जगाचे प्रेरणास्थान आहेत. आपण स्वप्ने पाहिली पाहिजेत आणि ती स्वप्ने पूर्ण केली पाहिजेत. स्वप्ने माणसाचे आयुष्य घडवू शकतात. पालकांनी आपल्या पाल्यांसाठी वेळ दिला पाहिजे. आपल्या मुलांच्या क्षमता पालकांनी ओळखायला हव्यात, असे प्रतिपादन स्टेट रजिस्ट्रार व हेड ऑफ नोटरी सर्विसेस अमीर परब यांनी काढले.

स्वामी विवेकानंद स्मृती संघ संचालित विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयाच्या बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस, विवेकानंद ज्ञान मंदिर माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक गोपीनाथ गावस, शिक्षण संस्थेचे सदस्य राघोबा लवू पेडणेकर उपस्थित होते.





**केरी-सत्तरी : विद्यार्थ्याला बक्षीस देताना अमीर परब. सोबत संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस,सोबत गोपीनाथ गावस व राघोबा पेडणेकर**

सुरुवातीला विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मान्यवरांचे फुलांची रोपटी देऊन स्वागत केले.दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर राघोबा पेडणेकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस व प्रभारी मुख्याध्यापक गोपीनाथ गावस यांनी आपले विचार व्यक्त केले.

विद्यामंदिरातर्फे विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. त्याचप्रमाणे विघ्नेश बाळकृष्ण बांदेकर, मानसी संतोष चौगुले, सिद्धी किशोर चौगुले, किशन शशांक दातये, ध्रुव दिलीप गावकर, मार्तंड प्रताप गावकर, साईश मोहन गावकर, अंश लक्ष्मण गावस, आश्रय प्रकाश गावस, कलश चंद्रशेखर गावस, कार्तिक प्रणय गावस, नक्ष भिवा गावस, प्राजक्ता रमाकांत गावस, प्रयांग प्रेमनाथ गावस, राई फटी गावस, श्रावण श्रीपाद गावस, भार्गवी आत्माराम गोवेकर, संजना विठ्ठल गुरव,हनिया बी करीम,हयालिया मोरब,आचल अनिल केरकर,लहिफा दवलसाब शिदनल,ध्रुवी गुरुदास माजिक,सान्वी विनायक मंचरकर,वेदिका शंकर मंचरकर,तेजस सुनील माने,वेद चंद्रकांत नाईक,निकिता कुमारी,विराज रमेश निलजकर,निधी राजेंद्र गावस यांना विशेष पुरस्कार देण्यात आले.

तसेच ऑलिम्पियाड परीक्षेतील विजेत्यां विद्यार्थ्यांना पदके व प्रशस्तिपत्रके वितरित केली.बक्षीस वितरण कार्यक्रमाचे निवेदन नूतन मळीक,अस्मिता गावस,अर्जुन गावकर यांनी केले.

प्रमुख पाहुणे अमीर परब यांचा यावेळी नामदेव गावस यांच्या हस्ते शाल,श्रीफळ,स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.सूत्रसंचालन नूतन मळीक यांनी केले तर अर्जुन गावकर यांनी आभार मानले.





**हणजूण : गोमंतक लोकसेवा ट्रस्टच्या महिला आश्रमाला फळे, कपडे व इतर साहित्याचे वाटप केल्यानंतर संजय विर्नोडकर, तुषार शिरोडकर, पांडुरंग कुंभार, तुकाराम शेटगावकर, मनोज आरोलकर, भारत बेतकेकर व इतर.**

# 'अँटी करप्शन' गोवातर्फे 'महिलाश्रम'ला फळे, कपड्यांचे वाटप

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १४ :** अँटी करप्शन फाऊंडेशन ऑफ इंडिया गोवा राज्यतर्फे हणजुण - आसगाव येथील गोमंतक लोकसेवा ट्रस्टच्या महिला आश्रमाला फळे, कपडे व इतर साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी अँटी करप्शन फाऊंडेशन गोवाचे संचालक संजय विर्नोडकर, सदस्य तुषार शिरोडकर, पांडुरंग कुंभार, तुकाराम शेटगावकर,मनोज आरोलकर, नूतन आसोलकर,सदिच्छा मांद्रेकर, धनराज मांद्रेकर, अनिता वेंगुर्लेकर, प्रेमनाथ डेगवेकर, भारत बेतकेकर उपस्थित होते. सुरुवातीला महिला आश्रमाच्या अध्यक्ष प्रतिमा गोवेकर यांनी स्वागत केले. यावेळी त्रिता पांडुरंग बाणावलीकर, सच्चिराम मंगेश नार्वेकर, मॅनेजर संजय शेट्ये, निष्का हळदणकर उपस्थित होते.

अध्यक्ष प्रतिमा गोवेकर यांनी सर्वांचे स्वागत केले. संजय विर्नोडकर यांनी अँटी करप्शन फाऊंडेशन ऑफ इंडियाची माहिती करून दिली. महिला आश्रमातील महिलांना यावेळी फळे तसेच कपडे व इतर, साहित्य वाटप करण्यात आले. निष्का हळदणकर यांनी आभार मानले